Digitally signed by
PATIL AVINASH
MADHUKAR
Date: 2025.07.03
16:20:40 +0530

JMFC, Ghodegaon

# घोडेगाव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकरी सो,

यांचे न्यायालयात

फौ.की.अर्ज- /२०२५.

**सौ.अश्विनी रवि ताते.** ------------------- **अर्जदार**

**विरुध्द**

**श्री.रवि संजय ताते व इतर ४** --------------------जाबदेणार.

**अर्ज- कौटूबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम व नियम २००५ चे अंतर्गत कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणे कामी.........**

**याकामी अर्जदार मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे.**

१) अर्जदार हिने या मे. कोर्टात जाबदेणारांविरुद्ध कौटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १४, १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे अर्ज केलेला आहे.प्रस्तुतचा मूळ अर्ज चालविण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. दरम्यानचे कालावधीत अर्जदार यांची उपासमार होत असल्यामुळे तसेच अर्जदार हिस तिच्या उदरनिर्वाहासाठी,औषधोपचारासाठी कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे तिचे आर्थिक, शाररीक, स्वस्थाचे नुकसान होऊ नये व तिची उपासमार होवू नये म्हणून दरम्यानचे काळात अर्जदार हिस जाबदेणार न.१ यांसकडून दरमहा रक्कम रुपये-१०,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दहा हजार रुपये) पोटगी मिळण्यात यावी या करिता अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज मे.न्यायालयात केलेला आहे.

२)अर्जदार हिचा जाबदेणार यांनी मानसिक,शाररीक छळ करून अर्जदार हिची जबाबदारी घेण्याचे टाळलेले आहे.सबब अर्जदार हि माहेरी तिचे आई-वडिलांसोबत नाईलाजस्तव रहात आहे.अर्जदार हिचा जांबदेणार याने स्वत:हून त्याग केलेला आहे.

त्यामुळे अर्जदार हिने जाबदेणार विरुध्द कौटूबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम व नियम २००५ चे अंतर्गत कलम १२,१४ १८,१९,२०,२२ व २३ अन्वये आदेश होणे व मिळणेकामी अर्ज मे न्यायालयात दाखल केलेला आहे.सदर अर्जाचा अंतिम निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार हिची आजमितीस उपासमार होत आहे.व तिची राहण्याची व आजारी पडल्यावर औषधोपचाराची गैरसोय होत असून जाबदेणार न.१ हा अर्जदार हिचे स्त्रीधन नष्ट करण्याची शक्यता आहे.

३) अर्जदार हिची माहेरची परिस्थिती हि अत्यंत गरिबीची असल्यामुळे अर्जदार हिस अतिशय हलाखीचे जीवन जगावे लागत आहे.याउलट जाबदेणार यांची परिस्थिती अत्यंत सधन असून त्यांची गावमौजे माळेगाव खुर्द, ता-मावळ, जिल्हा-पुणे येथे ५ एकर शेतजमीन आहे.त्यामध्ये जाबदेणार नं.१ ते ४ हे जिरायती व बागायती पिके घेत आलेले होते व आहेत.सदर शेतीच्या उत्पन्नातून जाबदेणार न.१ हा दरसाल रक्कम रुपये ५,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच लाख) च्या पुढे उत्पन्न घेत आहे. तसेच जाबदेणार नं.१ यांचेकडे २ बैल व ३ दुभती गाई असून सदर दुधाचे उत्पन्नापासून जाबदेणार न.१ यांस प्रतिमहा रक्कम रुपये-५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पाच हजार रुपये) इतके उत्पन्न मिळते.तसेच जाबदेणार न.१ हा एका नामांकित कंपनीमध्ये कामाला असून सदर नोकरीतून त्यांस प्रतिमहा रक्कम रुपये-१५,०००/-(अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार रुपये फक्त) इतके उत्पन्न मिळते.जाबदेणार नं.१ ते ५ हे शरीराने धडधाकट असून शेती व्यवसाय करून शेतातून सालोसाल उत्पन्न घेत आलेले होते व आहेत.वर नमूद केल्याप्रमाणे जाबदेणार याची आर्थिक परिस्थिती अतिशय सधन आहे.त्यामुळे अर्जदाराच्या मागणी प्रमाणे नुसकान भरपाईची व पोटगी देण्याची जाबदेणाराची ऐपत आहे. जाबदेणार नं.१ चे घरातील सर्व लोक कामविते असून जाबदेणार नं.१.वर कुणीही अवलंबून नाही.त्याची अर्जदार हिस प्रतिमहा रक्कम रुपये -१०,०००/-(अक्षरी

रक्कम रुपये दहा हजार देण्याची ऐपत आहे. सबब,अर्जदार यांस प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडलेले आहे.

**४) <u>अर्जदार हिची मे.न्यायालयास विनंती कि,</u>**

**अ)**अर्जदार हिने जाबदेणाराविरुध्द मूळ कौटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२,१४,१८,१९,२०,२२ व २३ प्रमाणे अर्ज केलेला आहे. प्रस्तुतचा मूळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत अर्जदार हिस जाबदेणार न.१ कडून दरमहा रुपये-१०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार रुपये)अर्ज दाखल तारखेपासून तूर्तातूर्त पोटगी त्वरित देण्याचा हुकुम व्हावा.

**ब)** इतर योग्य ते न्यायाचे हुकुम होण्यात यावेत.

घोडेगाव

दिनाक -२४ जून २०२५

अर्जदार तर्फे ॲड़

(डी.व्ही लोहोटे.)

अर्जदार

**(सौ.अश्विनी रवि ताते.)**